# मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद नागपूर,यांचे कार्यालय,
## नवीन प्रशासकीय इमारत सिव्हिल लाईन,नागपूर-४४०००१

दुरध्वनी क्रमांक.०७१२-२५६५१४५ ईमेल :- dyceog.zpngp@gmail.com
Website: zpnagpur.maharashtra.gov.in

---

जा.क्र.साप्रवि/विधीकक्ष/३११ /२०२५ दिनांक: ०९ /१२/२०२५

जिल्हा परिषद नागपूर.स्तरावरिल न्यायालयीन कामकाजासाठी विधी अधिकारी हे पद कंत्राटी पध्दतीने ११ महिन्याच्या कालावधीच्या मर्यादेत भरावयाचे असुन त्याकरिता जाहिरात क्र.०१/२०२५ नुसार विधी अधिकारी(कंत्राटी) या पदाकरिता अर्ज करण्याचा कालावधी दिनांक १०/१२/२०२५ पासून ते दिनांक १८/१२ /२०२५ रोजी रात्री २३:५९ वाजेपर्यंत अर्ज मागविण्यात येत आहे.

पदाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**१) पदाचे नाव** : - कंत्राटी विधी अधिकारी (एक पद)

**२) कामाचे स्वरुप** : -

अ) जिल्हा परिषद नागपूर स्तरावरील सर्व न्यायालयीन प्रकरणात परिच्छेदनिहाय अहवाल तयार करणे, शपथपत्र तयार करणे,इ.तसेच न्यायालयीन प्रकरणांचा पाठपुरावा करून शासनाची बाजु प्रभावीपणे मांडण्यासाठी जिल्हा परिषद पॅनलवरिल वैधानिक सल्लागार यांना सहाय्य करणे.

ब) कार्यालयाकडे प्राप्त होणा-या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबीबाबत/न्यायालयीन प्रकरणे सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.

क) वर्ग-३ व वर्ग-४ च्या आस्थापनेवरिल न्यायालयीन प्रकरणे/परिच्छेदनिहाय अभिप्राय (Parawise Comments) तयार करणे/सेवाविषयक/प्रशासकिय बाबी/विभागीय चौकशी इ.तथा समकालीन कायदयाची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती हाताळणे.

ड) प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी शासकिय अधिवक्त्याकडे पाठपुरावा करणे.जेथे शासन प्रतिवादी आहे अश्या प्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञापत्र संबंधित अधिका-यांच्या मदतीने तयार करणे.

इ) शपथपत्राचा मसुदा तयार करणे व त्यात सक्षम प्राधिका-याची मान्यता घेवुन विहित मुदतीत सादर होईल याची दक्षता घ्यावी.

ई) जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे.अश्या प्रकरणामध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करून तदअनुषंगाने अपील दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.

उ) अपील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपिलाचा मसुदा तयार करणे व संबंधित शासकिय अधिवक्त्याकडे पाठविणे व अपिलाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे.

ऊ) सर्व न्यायालयीन प्रकरणांसाठी जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर "नोडल अधिकारी" म्हणुन काम पाहणे.विधी विषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमुन दिलेले कार्य विहित मुदतीत पार पाडणे.

**३) शैक्षणिक अर्हता:** १) उमेदवार मान्यता प्राप्त विदयापीठातील कायदयाच्या अभ्यासक्रमात पदवीधर असावा.तसेच Constitutional किंवा Administrative या विषयात पदव्युत्तर असल्यास प्राधान्य असेल व उमेदवार सनद धारक असावा.

**४) अनुभव:** १) विधी अधिकारी(कंत्राटी)या पदासाठी मा.उच्च न्यायालय व इतर न्यायालयातील विधी कामकाजाचा वकिली व्यवसायाचा किमान ७ वर्षाचा अनुभव(वकालतनामा अथवा शपथपत्रासह ७ वर्षाचे) असणे आवश्यक राहिल.

**५) मानधन :** एकत्रित मानधन प्रतिमाह रुपये ५०,०००/-(रु.पन्नास हजार फक्त)

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

**६) अटी व शर्ती :-**

१. विधी अधिकारी (कंत्राटी) या पदाची नेमणुक ही पुर्णत: कंत्राटी स्वरूपाची असेल ही नियुक्ती न्यायालयीन प्रकरणाची देखरेख करण्यासाठी जिल्हा परिषद नागपूर व पंचायत समिती कार्यालयातील मा.न्यायालयीन प्रकरणी कायदेशीर सल्ला देण्याकरिता भरण्यात येत असल्याने सदर कंत्राटी विधी अधिकारी शासकिय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाहीत.तसेच याबाबत भविष्यात तसा दावाही करता येणार नाही.

२. विधी अधिकारी (कंत्राटी) या पदाची नेमणुक करार पध्दतीने प्रथमत: ११ महिन्यासाठी करण्यात येईल ११ महिन्यानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी वाढविता येईल.तथापि,अशी मुदत वाढविताना एकावेळी ही मुदत ११ महिन्यापेक्षा अधिक कालावधीसाठी असणार नाही.अशा प्रकारे जास्तीत जास्त तीन वेळा नियुक्ती करता येईल त्यानंतर पुनश्च: नियुक्ती करावयाची असल्यास निवड प्रक्रियेला सामोरे जावे लागेल.

३. नियुक्तीच्या वेळी ५०० रू.च्या स्टॅम्प पेपरवर जिल्हा परिषद समवेत बंधपत्र करार करावा लागेल.

४. करार पध्दतीने नेमणुक करण्यात आल्यानंतर एकत्रित मानधना शिवाय इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय राहणार नाही.

५. विधी अधिकारी (कंत्राटी) यांना कार्यालयीन वेळेत(सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५) जिल्हा परिषद कार्यालयात पुर्णवेळ उपस्थित राहावे लागेल.

६. विधी अधिकारी (कंत्राटी) यांची इतर शासकिय कार्यालयात विधीतज्ञ म्हणुन नेमणुक झालेली नसावी.

७. विधी अधिकारी (कंत्राटी) या पदासाठी उमेदवारांचे वय नियुक्ती वेळी ४५ वर्षापेक्षा जास्त नसावी.

८. जिल्हा परिषद कार्यालयातील कामकाजाबाबतच्या गोपनियतेचा भंग होता कामा नये.

९. विधी अधिकारी (कंत्राटी) यांची नियुक्ती झाल्यानंतर त्यांना मा.न्यायालयात/खाजगी नोकरी/व्यवसाय व इतर संस्थेत अथवा कार्यालयात काम करता येणार नाही.

१०. मराठी,हिंदी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक राहिल.

११. संगणक अर्हता (MS CIT तथा तत्सम) परिक्षा प्रमाणपत्र उतीर्ण असणे आवश्यक राहिल.

१२. उमेदवारांना आस्थापनेविषयक,सेवाविषयक,प्रशासकिय अश्या सर्व प्रकारच्या कायदयाची स्थिती तथा विभागीय चौकशी इ.बाबत ज्ञान असणे आवश्यक राहील.

१३. विधी अधिकारी (कंत्राटी) या पदासाठी उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक राहील.

जिल्हा परिषद,नागपूर कार्यालय नवीन प्रशासकीय इमारत सिव्हिल लाईन,नागपूर ४४०००१ उमेदवारांचे प्राविण्य पडताळणी साठी आवश्यकता वाटल्यास लेखी चाचणी अथवा प्रत्यक्ष मुलाखत(तोंडी) घेण्यात येईल आवश्यक सुचना zpnagpur.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर वर व कार्यालयाचे सुचना फलकावर देखील उपलब्ध आहे.

(विनायक महामुनी,भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,नागपूर

Scanned with OKEN Scanner